Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# जालना जिल्ह्यातील भूमि उपयोजनः एक अभ्यास

**सय्यद खालेदा सय्यद आरेफ**
संशोधक विद्यार्थी

**प्रस्तावना :**

भारत हा कृषीप्रधान देश आहे. एकूण भारतीय लोकसंख्येपैकी जवळपास ७०% लोकसंख्या कृषी व कृषी संबंधीत व्यवसायावर अवलंबून आहे. कृषी हा भारताचा प्राचीन काळापासून चालत आलेला व्यवसाय आहे. कृषी हा मानवाचा सर्वात महत्त्वाचा आर्थिक व्यवहार आहे. भारतीय व ग्रामीण अर्थव्यवस्था प्रामुख्याने शेतीवरच अवलंबून आहे.

भारतात जिरायती व बागायती या दोन्ही प्रकारची शेती केली जाते. मान्सून पर्जन्याद्वारे केली जाणारी कोरडवाहु कृषी म्हणजे जिरायती कृषी होय. जलसिंचनाद्वारे भाजीपाला, फळे, पिकांचे उत्पादन करणारी कृषी ही बागायती शेती होय. ऋतुमानानुसार बदलणाऱ्या हवामानामुळे सुद्धा कृषी प्रकारात विभागणी केली जाते. खरीप व रब्बी हंगामातील कृषी यामुळेच निर्माण होते.

**अभ्यासक्षेत्र :**

भौगोलिकदृष्ट्या जालना जिल्हयाचे स्थान महाराष्ट्र राज्यात साधारणपणे मध्यभागी आहे. तसेच मराठवाड्याच्या उत्तर दिशेस स्थित आहे. अंतराळात सोडलेल्या उपग्रहांशी सातत्याने संपर्क ठेवणे सोईचे ठरते. जालना जिल्हा १९.१ ते २०.३ या उत्तर अक्षांश व ७५.४ रेखांश ते ७६.४ या पूर्व रेखांशामध्ये वसलेला आहे. जिल्ह्याच्या उत्तर सीमेवर जळगाव, पुर्वेस बुलढाणा वसलेले आहेत. या जिल्ह्याची समुद्रसपाटीपासूनची सरासरी उंची ५३४ मीटर आहे.

सन २००१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ ७७१८ चौ.कि.मी. असून ते महाराष्ट्र राज्याच्या क्षेत्रफळाच्या तुलनेत २.५१% आहे. एकूण क्षेत्रफळाच्या १.३२% म्हणजे १०२.० चौ.कि.मी. क्षेत्रफळ नागरी विभागाचे व उरलेले ९८.६८% म्हणजे ७६१६ चौ.कि.मी. क्षेत्रफळ ग्रामीण विभागाचे आहे.

**उद्दिष्ट्ये :**

१. जालना जिल्ह्यात कृषी क्षेत्र अभ्यासणे.

२. जालना जिल्ह्यात कृषी विकासात येणाऱ्या अडचणीचा अभ्यास करणे.

३. जालना जिल्ह्यातील आर्थिक, सामाजिक व प्राकृतिक घटकांचा अभ्यास करणे.

४. जालना जिल्ह्यात कृषी संबंधीत घटक अभ्यासणे.

५. कृषी संबंधीत यंत्रांचा अभ्यास करणे.

**गृहितके :**

जालना जिल्ह्यातील कृषी उत्पादन वाढवण्यासाठी भौतिक व इतर सुविधाचा अभाव दिसून येतो.

**विषयाचा गाभा :**

जिल्ह्यातील शेतीविषयक पूर्ण सुधारित आकडेवारी २०००-०१ वर्षाकरिता उपलब्ध असून तुलनात्मक दृष्टीने सोईचे होईल म्हणून समालोचनासाठी अलीकडील या स्थाई आकडेवारीचा उपयोग करण्यात आला आहे. जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्र ७७३ हजार हेक्टर असून त्यापैकी जंगल व्याप्त क्षेत्र ६.५ हजार हेक्टर म्हणजेच ०.८४ टक्के आहे. शेतीकरिता उपलब्ध नसलेल्या क्षेत्रामध्ये बिगरशेती वापराखालील जमीन ५५.५ हजार हेक्टर म्हणजेच भौगोलिक क्षेत्राच्या ७.२% होती. पडीत व लागवडीलायक नसलेली जमीन १५.५ हजार हेक्टर म्हणजे २.०१ टक्के होती.

जालना जिल्ह्यातील तालुक्यांचे कृषी वापरासाठी येणारी जमीनीचे प्रमाण खालील प्रमाणे सांगता येतील.

**जमीनीचा वापर**

**जिल्हा : जालना क्षेत्र हेक्टरमध्ये संदर्भ वर्ष २०००-२००१**

| अ.क्र. | तालुका | एकूण भौगोलिक क्षेत्र | जंगलव्याप्त क्षेत्र | शेतला उपलब्ध नसलेले क्षेत्र | | | पडीत जमीनी व्यातिरिक्त लागवड न झालेली एकूण जमीन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | बिगर शेती वापराखालील जमीन | पडीत/लागवडी लायक नसलेली जमीन | एकूण (५+६) | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | भोकरदन | १३०७२२ | १५६१ | २५९४ | ७९९० | १०५८४ | १०१५ |
| २ | जाफ्राबाद | ७२७४४ | १९० | २०१५ | २२३९ | ४२५४ | २४१२ |
| ३ | जालना + | २२३४७६ | २३०७ | ३६४९ | २०८०३ | २४४५२ | ७३४ |
| ५ | बदनापूर | ७६८४९ | ७८३ | ५६५ | ३१९२ | ३७५७ | २०८१ |
| ६ | अंबड | ११५७१२ | १४२३ | १११२ | ४९८० | ६०९२ | ४३१ |
| ७ | परतूर | ७५३८७ | ९६ | २०८० | ८६७५ | १०७५५ | ६४० |
| ८ | मंठा | ७७७४३ | १०० | ३४८७ | ७७०१ | १११८८ | ८८७ |
| जिल्हा एकूण | | ७७२६३३ | ६४६० | १५५०२ | ५५५८० | ७१०८२ | ८१८२ |

जमीनीचा वापर

जिल्हा : जालना    क्षेत्र हेक्टरमध्ये    संदर्भ वर्ष २०००-२००१

| अ.क्र. | तालुका | पडित जमीन | | | निव्वळ क्षेत्र | एकापेक्षा अधिक (दुसोटा क्षेत्र) | लागवडी खालील एकूण क्षेत्र (१२+१३) | लागवडी लायक क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | चालू पड | इतर पड | एकूण पड (४+१०) | | | | |
| १ | २ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| १ | भोकरदन | ४३४४ | २६३४ | ६९७८ | १०६४५२ | १२६९४ | ११९१४६ | ११५० |
| २ | जाफ्राबाद | ७१८१ | ४७८९ | ११९७० | ५१९८८ | १६०१८ | ६८००६ | ६६६ |
| ३ | जालना + | १९० | ४१५४ | ४२४४ | १८५०७३ | २१२२० | २०६२९३ | ९३५ |
| ५ | बदनापूर | ७३८ | १७१३ | २४५१ | ६५११२ | १५५२९ | ८०६४१ | ७०२ |
| ६ | अंबड | ६३५ | ३३९३ | ४०२८ | ९८९२२ | १४७६३ | ११३६८५ | १३५ |
| ७ | परतूर | ५४९ | १२३३ | १७८२ | ६१०१४ | ३१९६२ | ९२९७६ | ६३५ |
| ८ | मंठा | ८७१ | ४०० | १२७१ | ६३४८७ | १९८२० | ८३३०७ | ६५७ |
| जिल्हा एकूण | | १४५०८ | १८३१६ | ३२८२४ | ६३२०४८ | १३२००६ | ७६४०५४ | ४८८० |

**निष्कर्ष :**

जालना जिल्ह्यातील कृषी विकासातील जमीनी क्षेत्राचा वापर अभ्यास करतांना हे निष्कर्ष समोर आले की, या जिल्ह्यातील ओलीताखालील क्षेत्राचे प्रमाण कमी असल्यामुळे दुसोटा पिकाखालील क्षेत्र कमी आहे. पाऊस चांगला झाल्यास काही भागात खरीपाचे पिक काढल्यानंतर रब्बीचे दुसरे पिक कोरडवाहु जमीनीत घेतले जाते. २०००-०१ साली एकापेक्षा अधिक वेळा लागवडीखालील क्षेत्र १३२ हजार हेक्टर महणजेच निव्वळ कसलेल्या क्षेत्राच्या २०.८८% होते.

**संदर्भ :**

१. "कृषी भूगोल", विठ्ठल घारपुरे
२. "जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन" २००६-०७
३. "महाराष्ट्र शासन जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन" मार्च २००९
४. www.jalna.gov.in